Listening paragraph- (Any one)

कोणे एके काळी एका जंगलातली ही गोष्ट आहे. एक मोठे झाड नेहमी त्याच्या बाजूला वाढणाऱ्या गवताला आणि झुडुपांना नेहमी म्हणायचं कि तो कसा त्यांच्यापेक्षा मजबूत आहे. त्याने तर असे सुद्‌धा सांगितले कि " जर मोठ्‌ठे वादळ आले तरी तो घट्‌ट ताठ उभा राहू शकतो. मी हवेच्या झुळूकेवर स्वतःची मान खाली करीत नाही.तुम्ही मात्र खरेच लगेच मान टाकता." झुडुपे आणि गवत काहीच ना बोलता गप्प राहिले. त्या रात्री अचानक खूप जोराचा वारा सुरु झाला आणि तुफान आले. तुफानी पाऊस खूप वेळेपर्यंत सुरु होता. सगळीकडे चिखल झाला होता. काही वेळाने अचानक ते झाड मुळासकट तुटून पडले. त्याक्षणी एक झुडूप म्हणाले," बरे झाले देवा तु आम्हाला असे बनवले नाही. कारण आम्ही वाऱ्याबरोबर वाकु शकतो म्हणून तुटत नाही."
बोध- गर्व कधीही चांगला नाही.

प्र. १. मोठे झाड गवताला आणि झुडुपांना नेहमी काय म्हणायचा?
प्र. २. झुडुपे आणि गवत केव्हा मान टाकतात?
प्र.३. मोठे झाड तुटून का पडले?
प्र.४. झुडूप झाड तुटल्यावर काय म्हणाले?
प्र.५. आपल्याला ह्या गोष्टीवरून काय कळले?


- Produced by BMM Shala Exam Committee
- © Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
- All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

<u>Listening paragraph</u>

अजय सात वर्षाचा होता. त्याला लहानपणापासून स्वच्छतेची आवड होती. पायाला थोडीही माती लागलेली त्याला चालत नसे. नेहमी पायात मोजे बूट घालूनच तो राहत असे. त्याला कपडे नेहमी स्वच्छ लागत. पाणी पितांना अंगावर पाणी पडलेले त्याला चालत नसे. पावसाळा त्याला अजिबात आवडत नसे. शाळेत मुले त्याला हसायची.

प्र १. अजय किती वर्षाचा होता?

प्र २. त्याला कश्याची आवड होती?

प्र ३. त्याला कपडे कसे लागत?

प्र ४. पायाला माती लागू नये म्हणून तो काय करीत असे?

प्र ५. त्याला पावसाळा का आवडत नसे?

- Produced by BMM Shala Exam Committee
- © Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
- All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

Reading Paragraph- (Any one)

ईरा भारतात मामाकडे कोकणात गेली. तिथे ती रोज सकाळी उठून आजीबरोबर मागच्या बागेत फुले तोडायला जायची. बाग अगदी हिरवीगार आणि फुलांनी भरलेली असायची. ते बघून ईरा टाळ्या वाजवायची. आजीचा हात सोडून फुलपाखरांच्या मागे धावायची. बागेत सदाफुली, गुलाब, मोगरा, अबोली, जाई, जुई , चाफा वेगवेगळी फुले गोळा करून मग घरी यायची. आजी फुलांचे देवासाठी हार करायची. मग ईरासाठी जुईच्या फुलांचा गजरा करायची. ईराची छान वेणी घालुन त्यात तो गजरा  लावायची. ईराला हे सगळे खूप आवडायचे.

प्र १. ईरा कुठे गेली होती?
प्र २. आजीबरोबर ईरा सकाळी कुठे जायची?
प्र ३. बागेत कोणकोणती फुले होती?
प्र ४. आजी फुलांचे काय करायची?
प्र ५. इराला काय आवडायचे?


- Produced by BMM Shala Exam Committee
- © Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
- All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

Reading Paragraph

आज रियाचा वाढदिवस. रियाला आज नवीन सायकल मिळाली. ती चमकदार गुलाबी आणि चमकदार आहे. तिच्या काकांनी तिला वाढदिवसाची भेट म्हणून दिली. तिला आश्चर्यचकित करण्यासाठी त्यांनी ती  एका झुडुपाच्या मागे लपविली. रियाने झाडामागे सायकल पाहिली तेव्हा तिने आनंदाने उडी मारली. तिने काकांना घट्ट मिठी मारली. तिला तिची नवीन सायकल खुप आवडते आणि ती तिच्या काकांवर प्रेम करते. तिला आणखीही भेटी मिळाल्या पण ही तिची खास आवडती भेट आहे.

प्र १. सायकलचा रंग कोणता आहे?

प्र २. ही कोणाची भेट होती?

प्र ३. ती कोठे लपवली होती ?

प्र ४. रियाने सायकल पाहिल्यावर काय केले?

प्र ५. तुम्हाला वाढदिवसाला काय हवे?


- Produced by BMM Shala Exam Committee
- © Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
- All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.